आज़ादी का अमृत महोत्सव

# कार्यालय नागपूर महानगरपालिका नागपूर

सहाय्यक आयुक्त यांचे कार्यालय

धरमपेठ झोन क्र. 2

हरणे महिला समाजचे मागे,गोकुळपेठ,नागपूर440010दुरध्वनी क्र. 0712-2565589

क्रमांक 258/OW/ACZ/2025.26 दिनांक 18 / 07 /2025

प्रति,

श्री अनिलकुमार सुरेखा
प्लॉट नं ४९, हंस सुपर मार्ट जवळ,
अग्रसेन रोड, धरमपेठ, नागपूर.
मो.न. ९४२१७७९३६०

## अंतिम आदेश
**(पारित दि. 18.07.2025)**

ज्याअर्थी दि. ०५.०६.२०२५ रोजी करण्यात आलेल्या मौका चौकशी दरम्यान आपण प्लॉट नं ४९, हंस सुपर मार्ट जवळ, अग्रसेन रोड, धरमपेठ, नागपूर या ठिकाणी नागपूर महानगरपालिका/नियोजन प्राधिकरणाच्या परवानगीशिवाय भुखंडाच्या सामासिक अंतरामध्ये एकुण १२.१०x ३.५४ = ४२.८३४ चौ.मी. चे अनधिकृत बांधकाम केले असल्याचे निदर्शनास आले.

ज्याअर्थी उक्त् अनधिकृत बांधकाम आपल्या स्तरावर ३५ दिवसांच्या कालावधीत निष्काशित करण्याकरीता आपणांस महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ५३(१) अंतर्गत नोटीस क्र. मनपा/ससंनर/मप्रावनर/कलम ५३(१) /५८३, दि. ०९.०६.२०२५ तामील करण्यात आली होती, पण अद्याप त्याची अंमलबजावणी झाल्याचे आढळून आले नाही. करीता, मा. सर्वोच्य न्यायालयाचे दि. १३.११.२०२४ रोजीचे दिशानिर्देश व नागपूर महानगरपालिका, परिपत्रक क्र. नगर रचना /अनधिकृत बांधकाम /२७७/२०२५, दि. ०७ मे, २०२५ अन्वये आपणांस पत्र क्र. ६८२/OW/AC/Z-II, दि. १५.०७.२०२५ अन्वये दि. १८.०७.२०२५ रोजी सुनावणी करीता ११.०० वाजता सहाय्यक आयुक्त यांच्या समक्ष हजर राहण्याबाबत सुचित करण्यात आले होते.

ज्याअर्थी दि. १८.०७.२०२५ रोजी सकाळी ११:४५ वाजता सुनावणीकरीता धरमपेठ झोन क्र. २ सहाय्यक आयुक्त कार्यालयात आपण स्वत: हजर होते. सुनावणी दरम्यान आपणांस बांधकामाचे मालकी हक्काचे व बांधकाम परवानगी चे कागदपत्रे मागीतले असता आपण खालीलप्रमाणे कागदपत्रे सादर केले.

१. नागपूर सुधार प्रन्यास, Building Permit No CS/७६६/५३३८, दि. ०६.१२.१९६२
२. नागपूर सुधार प्रन्यास, Building Permit No CS/१३०८/५३३८, दि. ०६.१२.१९६२
३. नागपूर सुधार प्रन्यास, Memorandum No १२३८२, दि. ०६.१२.१९६२
४. इमारतींच्या जागांसाठी सनदेचा नमूना (श्री. नथमल महलीराम सुरेखा)
५. Aggrement copy for conservancy Lane
६. Tax Reciept, House No ५१, Ward No ७०, Index No ७०००0१०६
७. देयक बिल, स्थावर विभाग, म.न.पा. (No EO/११२३,दि.२१.०१.२०१२)
८. Sewer Line Conection Plan

Received
A.K. Surekha
9421779360
19/7/25

वरीलप्रमाणे कागदपत्र सादर केले असून सादर करतेवेळी उक्त अनधिकृत बांधकामाचा मंजूर नकाशा व मालमत्तापत्रक हेतु पुरस्प्र सादर केले नाही, तसेच या व्यतिरिक्त माझ्याकडे मालमत्तेबाबत कुठलेही दस्ताऐवज सद्यस्थितीत उपलब्ध नाही, असे सांगीतले.

नागपूर सुधार प्रन्यासनी निर्गमित केलेले इमारत परवाना (Building Permit) वर्ष १९६२ चे असुन उक्त अनधिकृत बांधकाम अंदाजे १० वर्ष जुने असुन सामासिक अंतरामध्ये (Marginal Space) असल्याने नागपूर महानगर प्रचलित Unified Development Controal and Promotion Regulations (UDCPR) २०२० तसेच महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ अंतर्गत नियमितीकरणास (Componding) अपात्र असल्याने आपणांस उक्त अनधिकृत बांधकाम हा आदेश प्राप्त् झाल्याचे दिनांकापासून १५ दिवसात निष्काशित करण्याचे आदेशित करण्यात येत आहे.

उपरोक्त आदेशाचे पालन विहीत कालावधीत न केल्यास उक्त अधिनियमात नमूद कायदेशिर कार्यवाहीस आपण पात्र ठराल, तसेच विहीत कालावधी नंतर तुमच्या जबाबदारी व खर्चाने वरील आदेशाची अंमलबजावणी महानगरपालिकेव्दारे करण्यात येईल. तसेच याबाबत संबंधीत पोलीस स्टेशनमध्ये आपल्या विरुध्द फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

18.7.25

सहाय्यक आयुक्त
धरमपेठ झोन क्र. २
नागपूर महानगरपालिका, नागपूर

प्रतिलीपी माहितीस्त्व सविनय सादर :-

१. मा आयुक्त तथा प्रशासक, नागपूर महानगरपालिका, नागपूर सिव्हील लाईन्स्, नागपूर .
२. मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, सिव्हील लाईन्स्, नागपूर.